# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.07.2025** **वार-सोमवार**

---

**विखेपाटील**

पुणे शहर मंजूर कोट्यापेक्षा आठ टीएमसी अधिक पाणी वापरत आहे, याबाबत एक कृती दल तयार करण्यात आलं असून पाण्याचा गैरवापर टाळण्यासाठी ते काम करेल अशी माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. पुणे शहराच्या पाणी वापराबाबत पाटबंधारे विभाग आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांची एक बैठक विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज झाली; त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मंत्री माधुरी मिसाळ, महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. पुणे शहराला तेरा टीएमसी पाण्याचा कोटा मंजूर आहे; मात्र सध्या 22 टीएमसी पाण्याचा वापर केला जात आहे. महापालिकेकडून वितरण व्यवस्थेत 40 टक्के गळती होत आहे. या अतिरिक्त पाणी वापरामुळे इंदापूर आणि दौंड यासह इतर तालुक्यांच्या सिंचनावर परिणाम होत आहे. ही गळती बंद करण्यासाठी प्रयत्न करणं आवश्यक आहे, असं विखे पाटील म्हणाले.

**शिदफडणीस**

व्यंगचित्रांच्या क्षेत्राबाबत शिदंचा समर्पणभाव आणि नवीन तंत्रज्ञाना  विषयीची त्यांची स्वागतशील भूमिका या गुणांमुळे शि.द.फडणीस वेगळ्या उंचीवरचे व्यंगचित्रकार ठरतात, असा सूर कला आणि साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी परिसंवादात व्यक्त केला.

ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस उद्या म्हणजे २९ जुलै रोजी वयाची शंभर वर्षे पूर्ण करत आहेत. यानिमित्त वसुंधरा क्लब आणि कार्टूनिस्ट्स कम्बाइन यांनी 'शि. द. १००' हा तीन दिवसांचा महोत्सव पुण्यात आयोजित केला आहे. यामध्ये 'शि. द. : कला आणि कल्पना' या विषयावर आज झालेल्या परिसंवादात मंगला गोडबोले, मिलिंद जोशी, चंद्रमोहन कुलकर्णी, सतीश पाकणीकर यांनी आपले विचार मांडले. चारुहास पंडित यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

pmc

पुणे महापालिकेची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना आवश्यक असलेली ना हरकत प्रमाणपत्र, तातडीने मिळावीत यासाठी महापालिका स्वतंत्र कक्ष उभारणार आहे. आगामी महापालिका निवडणुकीसाठी पुणे महापालिकेचं प्रारूप प्रभाग रचनेचं काम अंतिम टप्प्यात आलं आहे. हरकती-सूचना, राज्य शासन आणि राज्य निवडणूक आयोग यांची मंजुरी या सर्व प्रक्रिया होऊन ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत अंतिम प्रभागरचना जाहीर होण्याची शक्यता आहे.

Pcmc

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाने प्रभागनिहाय पूर नियंत्रण पथकं कार्यरत केली आहेत. नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत संबंधित प्रभाग कार्यालय अथवा अग्निशमन केंद्राशी संपर्क साधावा, असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

**मोहोळ**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं यंदा तीनशेवं जयंती वर्ष आहे. आणि याच वर्षी राज्य सरकारने गणेशोत्सवाला राज्यउत्सव म्हणून मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे; त्या पार्श्वभूमीवर पुण्यातल्या साई मित्र मंडळानं यंदाच्या गणेशोत्सवाच्या आयोजनाची जबाबदारी महिलांच्या हातात देण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकाराने हा निर्णय घेण्यात आला; या मंडळाच्या देखाव्याच्या कामाचा प्रारंभ मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते काल झाला.

**विद्यापीठ**

जर्मनीमध्ये पार पडलेल्या जागतिक विद्यापीठ स्पर्धेत पुण्याच्या वैष्णवी आडकर हिनं कास्य पदक पटकावलं आहे. या निमित्तानं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज तिचा सत्कार करण्यात आला. कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते वैष्णवीला गौरवण्यात आलं.

**डेंग्यू**

पुण्यात या महिन्यात डेंग्यूच्या रुग्णसंख्येत दुपटीहून अधिक वाढ झाली; आतापर्यंत २६२ संशयित रुग्ण आढळून आले; त्यांपैकी ११ रुग्णांना डेंग्यूचं निदान झालं आहे. त्याचबरोबर हिवताप आणि चिकुनगुनियाचे रुग्णही वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेचा आरोग्य विभाग प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवत आहे.

डासांची पैदास रोखण्यावर भर दिला जात आहे, याबाबतच्या नियमांचं पालन न करणाऱ्या घरांना आणि आस्थापनांना नोटीस बजावून दंडही केला जात आहे.

**लम्पी**

पुणे जिल्ह्यात गोवंशीय जनावरांमध्ये लम्पी त्वचारोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे पुणे महापालिकेने गोवंशीय जनावरांना लम्पी प्रतिबंधक लसीकरण बंधनकारक केलं आहे. जिल्ह्यातले नऊ तालुके ‘नियंत्रित क्षेत्र’ म्हणून घोषित करण्यात आले आहेत; याबाबतच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या काही हलक्या सरी बरसल्या. उद्याही शहरात हलक्या पावसाचा अंदाज असून घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

दरम्यान गेल्या काही दिवसांच्या पावसामुळे खडकवासला धरण साखळीत ९० टक्क्यांपेक्षा जास्त पाणी साठा झाला असून धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**